**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १३/२०२०** | **दिनांक १४/०२/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०८/०२/२०२० ते १४/०२/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १५/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून १९/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ | ११/०२ | १२/०२ | १३/०२ | १४/०२ | | १५/०२ | १६/०२ | १७/०२ | १८/०२ | १९/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २८.० | ३१.६ | ३१.८ | ३३.८ | ३४.० | ३४.२ | ३४.८ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३५ | ३६ | ३६ |
| १५.४ | १७.२ | २०.० | १९.५ | १९.६ | २२.५ | २२.२ | किमान तापमान (अं.से) | १९ | १९ | २० | २१ | २० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ० | ० | ० | ० |
| ८६ | ६१ | ५९ | ७२ | ६३ | ६८ | ५२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ३५ | ३४ | ३४ | ३३ | ३७ |
| ३३ | ३४ | ५१ | - | ५१ | ४३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २१ | १९ | १८ | १७ | १७ |
| ४.० | ५.९ | ५.३ | ४.६ | ३.९ | ३.७ | ३.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८.७ | ७.८ | ८.५ | ७.३ | ६.४ |
| आ. | आ.द. | आ.द. | शांत | इ. | इ. | द. | वाऱ्याची दिशा | ई.पू. | ई.पू. | पू. | पू. | आ.पु. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १५ ते १९ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **फुटवे अवस्था** | • उन्हाळी भात पिकास नत्र खताचा दुसरा हप्ता फुटवे येण्याच्या वेळी (पुनर्लागवडीनंतर ३० ते ४० दिवसांनी) हेक्टरी ८७ कि.ग्रॅ. युरिया देण्यात यावा<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें. मी. नियंत्रित करावी. |
| **वाल** | **दाणे अवस्था** | • तापमानात वाढ संभवत असल्याने दाणे भरण्याच्या अवस्थेत असलेल्या वाल पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये, फळगळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रती झाडास या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ पाण्याच्या पाळ्या दयाव्यात तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• उत्पादन व फळांची प्रत सुधारण्यासाठी १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना करावी.<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **काजू** | **फळधारणा अवस्था** | • फळधारणा झालेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत).<br>• आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **नारळ** | **-** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या नारळ बागेस पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच माडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **फळबाग रोपवाटिका** | **रोप अवस्था** | • आर्द्रतेत घट व तापमानात वाढ संभवत असल्याने फळबाग रोपवाटिकेस पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |

| | | |
|---|---|---|
| **कुकुटपालन** | - | • दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**